# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 01/07/2020 (बुधवार)
(दुपार)

### हुंडयाची मागणी करून आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बोरी :– पो.स्टे. बोरी दिनांक 21/07/2017 चे 19.34 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरीहर विठठलराव ढाकुळकर वय 65 रा. आलेगांव ता. बाबुळगांव जिल्हा यवतमाळ यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे अप. क्र. 360/2017 कलम 306,498(अ) भादवी. सह.कलम 3,4 हुंडाबळी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 11/07/2017 चे 15.00 वा. दरम्यान आरोपी नामे क्र. 1) संतोष मधुकरराव चौधरी वय 39 वर्ष, आरोपी क्र. 2) नलीनी अरूण खोपाळ वय 38 वर्ष व आरोपी क्र. 3) अरूण नामदेवराव खोपाळ वय 45 वर्ष सर्व रा. वार्ड क्रमांक 5 बोरी जिल्हा नागपूर यांनी संगणमत करून पिडीत नामे सौ. रंजना संतोष चौधरी वय 37 वर्ष रा. बोरी हिला तिचे वडीलांकडुन पैशाची मागणी केली असता परंतु तिचे वडीलाने एक लाख रूपये न दिल्याने तिला शारीरीक व मानसीक त्रास दिला. सदरचे त्रासाला कंटाळुन पिडीतीने विषारी औषध प्राशन करून तिला मरनास प्रवृत्त केले. आरोपीला दिनांक 26/07/2017 चे 18.40 वा. दरम्यान अटक करण्यात आली होती.

सदर प्रकरणाचा तपास तत्कालीन सहा. पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत ठवरे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 01/07/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती. रहीमत के. शेख अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 498 (अ)भादंवि. मध्ये 1 वर्ष साधी कैद व 5,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना साधी शिक्षा, अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. गौरकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहा. पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, वासुदेव मस्के, भवानी प्रसाद मिश्रा, पोहवा श्री.मनोज तिवारी, अनिल व्यवहारे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर